पुढारी | सोमवार २२ सप्टेंबर २०१४

# माळीण आपद्ग्रस्तांसाठी विद्यार्थ्यांची मदत तहसीलदारांकडे सुपूर्द

**दोडामार्ग : वार्ताहर**

नवनिर्माण शिक्षण संस्था रत्नागिरी संचलित, लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने जमा करण्यात आलेला रू.१५०००/- चा निधी दोडामार्गचे तहसीलदार श्री. संतोष जाधव यांच्याकडे माळीण आपद्ग्रस्तांसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.



दोडामार्ग : तहसीलदार श्री. जाधव यांना धनादेश देताना प्राचार्य डॉ. पाटील व अन्य. (छाया : रत्नदीप गवस)

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवकांनी व प्राध्यापकांनी रविवार १४ सप्टेंबर रोजी दोडामार्ग बाजारपेठेत पुणे जिल्ह्यातील माळीण गावच्या आपद्ग्रस्तांसाठी मदत फेरीचे आयोजन केले होते. या मदतफेरीत जमा झालेला रू. १५०२८/- रक्कमेचा धनादेश शुक्रवार १९ सप्टेंबर २०१४ रोजी तहसीलदार श्री. संतोष जाधव यांच्याकडे मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्यासमवेत विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. एस. यु. दरेकर, प्रा. एस. एन. जाधव, विद्यार्थी प्रतिनिधी अनिल गावडे, ममता गायचोर व भूषण सावंत उपस्थित होते. महाविद्यालयाने सामाजिक उपक्रम राबविल्याबद्दल तहसीलदारांनी समाधान व्यक्त केले.